॥ तुझे गीत गाण्यासाठी ॥

गायकः सुधीर फडके

तिन्ही लोक आनंदाने,
भरुन जाउदे रे, तुझे गीत गाण्यासाठी।
सूर लावु दे रे, तुझे गीत गाण्यासाठी ॥ धृ. ॥

शुभ्र तुरे माळुन आल्या, निळ्या निळ्या लाटा,
रान फुले लेवुन सजल्या, या हिरव्या वाटा।
या सुंदर यात्रे साठी, मला जाऊदे रे,
तुझे गीत गाण्यासाठी ॥ १ ॥

मोर केशराचे झुलती, पहाटेस दारी,
झर्यातुनी दिडदा दिडदा वाजती सतारी।
सोहळ्यात सौंदर्याच्या, मला न्हाउदे रे,
तुझे गीत गाण्यासाठी ॥ २ ॥

शांत शांत उत्तर रात्री, मंद मंद तारे,
तुझे प्रेम घेउन येती, गंध धुंद वारे।
चांदण्यात आनंदाच्या, मला न्हाउदे रे,
तुझे गीत गाण्यासाठी ॥ ३ ॥

एक एक नक्षत्राचा, दिवा लागताना,
आणि फुले होण्यासाठी, कळ्या जागताना।
पौर्णिमा स्वरांची माझ्या, तुला वाहु दे रे,
तुझे गीत गाण्यासाठी ॥ ४ ॥